# सं पा द की य

## आणि ‘बिहारी सतसई’चे नवे काही ‘दोहे’

महाराष्ट्रात भाजपच्या ‘ऑपरेशन कमळ’च्या मोहिमेला तब्बल अडीच वर्षांनंतर यश आले. या कालावधीत एकही दिवस असा गेला नसेल, ज्यात भाजपने साम-दाम-दंड-भेद अस्त्र वापरून महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे सरकार अस्थिर करण्यासाठी कारस्थाने आखली नाहीत. या कूट मोहिमेचे नायक देवेंद्र फडणवीस एक चांगले विरोधी पक्षनेते ठरले. त्यांनी सत्ताधारी पक्षांच्या प्रत्येक धोरणाचा समाचार घेत ठाकरे सरकारला काम करू दिले नाही. एकीकडे त्यांनी लोकशाहीची आयुधे वापरली तर दुसरीकडे केंद्रीय सरकारच्या मदतीने ‘ईडी’ या अस्त्राचाही विधायक (!) वापर करून घेतला. त्यामुळे महाराष्ट्रातील ‘ऑपरेशन लोटस’चे हे सरकार ‘ईडी सरकार’ (एकनाथ-देवेंद्र) म्हणून ओळखले जात आहे.

महाराष्ट्रात ‘कमळ’ फुलवल्यानंतरही मधली ४० दिवस हनीमून पिरीयडची वाट पाहण्यात गेली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या ‘मित्रमंडळा’ने कॅबिनेटच्या नियुक्तीपूर्वीच ठाकरे सरकारची जुनी निर्णये बदलण्याचा धडाका लावला. दीड महिन्याच्या कालावधीत ठाकरे सरकारचे अनेक निर्णय, योजना, घोषणा, निधी वितरण रद्द केले किंवा त्यावर स्थगिती आणली. या दोन लोकांच्या सरकारने (मित्रमंडळ) मंत्रिमंडळाच्या बैठका घेण्याचा सपाटा लावला व तडकाफडकी अनेक आकर्षक निर्णयही घोषित केले.

दोनच लोकांनी तब्बल ४० दिवस सरकार चालवल्यानंतर ९ ऑगस्ट रोजी मंत्रिमंडळ स्थापन झाले. मंत्रीपदावरून इच्छुकांची झालेली रस्सीखेच महाराष्ट्राने पाहिली. पहिला मोठा वाद संजय राठोड यांच्या मंत्रिपदावरून झाला. पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणी संजय राठोडांवर जेव्हा आरोप झाले, तेव्हा त्यांचा राजीनाम्यासाठी फडणवीसांनी गजहब केला होता. त्यामुळे भाजपच्या शुद्धीकरण धोरणावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत.

देवेंद्र व एकनाथ यांच्या सरकारपुढे अनेक आव्हाने आहेत. किंबहुना आव्हानाची ही खोल दरी फडणवीस यांनीच विरोधी पक्ष असताना निर्माण करून ठेवलेली आहे. त्यांनी तत्कालीन सरकारच्या अनेक निर्णयावर आक्रमक भूमिका घेतली, त्यामुळे आता ते सत्ताधारी झाल्याने त्या जुन्या निर्णयावर त्यांची भूमिका काय असेल, हे पाहणे औत्सुक्याचा विषय ठरेल.

याशिवाय बाकीचे अनेक निर्णय ज्यात शेतकऱ्यांचे प्रश्न, हमीभाव, त्यांच्या आत्महत्या, पॅकेज, मराठा आरक्षण निर्णय, वीज बिल माफी, एस. टी. महामंडळाचे प्रश्न, ओबीसी आरक्षणाशिवाय रखडलेल्या निवडणुका, आरेची मेट्रो कारशेड इत्यादी बाबत फडणवीस आता काय भूमिका घेतील हे पाहण्यासारखे असेल. दुसरीकडे ‘राजकीय हिंदुत्वा’साठी बंड करत आहोत, अशी घोषणा करून उद्धव ठाकरेंची साथ संगत सोडणाऱ्या ‘शिंदेसेने’तील महत्त्वाकांक्षी अंतर्गत धुसपूस, तसंच स्वातंत्र्य टिकवून ठेवणे हेही एक मोठे आव्हान आहे.

विरोधी पक्षाला भाजपच्या अनियंत्रित सत्तेवर नियंत्रण व निर्बंध लावण्याची मोठी संधी चालून आली आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरेंना राजकीय अस्तित्व टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. महाविकास आघाडीमध्ये सर्वात जास्त फुटेज शिवसेनेला मिळाले व मिळत आहे. मध्यंतरी पटोलेंमुळे काँग्रेसमध्ये जरासा उत्साह संचारलेला दिसला. तर राष्ट्रवादीचे संघटनात्मकदृष्ट्या मजबूत होण्याचे प्रयत्न सुरू काही प्रमाणात यशस्वी होताना दिसून येतात. सत्तेचे सेक्युलर गणित शिवसेनेला लाभ मिळवून देऊ शकते. येणाऱ्या

स्थानिक स्वराज्य संस्था आणि नगरपरिषदा व महापालिका निवडणुकीत महाविकास गटाला आपली पिछेहाट रोखण्याचे आव्हान आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सेनेकडे मुंबई महापालिकेवर सत्ता अबाधित ठेवण्याचे आव्हान आहे. कारण मागच्या वेळी फार थोड्या फरकाने भाजपने मुंबई महानगरपालिका गमावली होती. या पार्श्वभूमीवर 'ईडी सरकार' कुठली व्यूहनीती आखेल ही एक धास्ती स्वाभाविक विरोधकांपुढे आहे.

ऑपरेशन कमळचा उत्साह व जल्लोष अजून संपलाही नव्हता की, बिहारमध्ये भाजपला नामुष्कीचा सामना करावा लागला. सत्तेचे जुने भागीदार नीतिशकुमार यांनी भाजपशी युती तोडत असल्याची घोषणा करत मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. भाजपसाठी हा फार मोठा धक्का मानला जात आहे, तर 'जनता दल युनायटेड' (जदयू)चा सेफ गेम! कारण चर्चा होती की, बिहारमध्येही 'ऑपरेशन कमळ' नीतिशकुमार यांना चेकमेट करणार होते, पण ऐनवेळी त्यांनी धोबीपछाड केली. परिणामी सध्या भाजपच्या गोटात संतापाचे वातावरण आहे.

वरवर पाहता बिहारमध्ये सत्तापालट झाले नाही, केवळ 'राष्ट्रीय जनता दला'ला (राजद) सत्तेचे भागीदार केले गेले. विरोधी पक्ष असलेला राजद एकाएकी सत्तेत आला. त्यांनीही विविध प्रश्नावर तत्कालीन सरकारला धारेवर धरले होते. भाजप व नीतिश सरकारच्या धोरणाचा वेळोवेळी समाचार घेतला होता. आता तेच नीतिशकुमार त्यांचे सहकारी झाले आहेत. नीतीशकुमार यांची वैयक्तिक 'अँटी इनकंबन्सी' वगळता राजदकडेही आव्हानाची रीघ आहे. पहिले मोठे आव्हान म्हणजे लालूप्रसाद यादव कुटुंबीयावरील ईडीचे छापे! सूडबुद्धीचे अस्त्र केवळ राजदवर उगारले जाणार नाही तर हीच गत नीतिशकुमार यांचीही होईल. कारण भाजप कृतीहिन होऊन स्वस्थ बसेल, अशी शक्यता दिसत नाही. कारण सुशील मोदींची राज्यसभेत वर्णी लावून भाजप बिहारमध्ये मोठा खेळ रंगवणार होती. पण..

दिल्लीत सरकार स्थापनेचा मार्ग उत्तरप्रदेश व बिहारमधून जातो. त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत बिहार हा चर्चेच्या केंद्रस्थानी असेल. २०१९ला नीतिशकुमारमुळे सार्वत्रिक निवडणुकीत भाजपला चांगला फायदा झाला होता. आता जदयूने भाजपशी युती तोडल्यामुळे केंद्रीय पातळीवरील तमाम विरोधी पक्षांमध्ये चैतन्याचे वातावरण दिसते. नीतिशकुमार यांना जोडून 'पीएम मटेरियल'ची चर्चा सुरू झाली आहे. स्मरण असावे की, बिहारमध्ये २०१५ साली महागठबंधन सरकार स्थापन केल्यानंतर नीतिशकुमारांविषयी अशीच चर्चा सुरू झाली होती. पण २०१७ येताच हवा बदलली. आता २०२२ साली त्यांनी 'पुन्हा एकदा' भाजपशी काडीमोड घेतला आहे त्यामुळे विरोधी पक्षाचे एक मोठा चेहरा म्हणून तूर्तास त्यांना प्रचारित केले जात आहे. परंतु नीतिशकुमार विश्वासू ठरू शकत नाहीत, अशीही चर्चा विरोधकांमध्ये सुरू आहे. यापूर्वी अनेकदा त्यांनी दलबदल केलेला आहे त्यामुळे त्यांच्यावर सहजासहजी विश्वास ठेवणे सयुक्तिक नाही, अशी धारणा झालेली आहे.

प्रादेशिक पक्षांना नेस्तनाबूत करण्याचे एकचालकानुवर्ती धोरण घेऊन भाजपचे 'ऑपरेशन लोटस'चे अश्व बेलगामपणे धावत आहेत. या अघोरी विस्तारवादाच्या रथाला लगाम लावणे तमाम विरोधकांना जड जात आहे. भाजपच्या धर्मांध राजकीय धोरणांना रोखणे व लोकशाही प्रक्रियेत विरोधी पक्ष अबाधित ठेवणे ही बदलत्या राजकीय संस्कृतीत दोन आव्हात्मक कार्ये झाली आहेत. थोडक्यात उपरोक्त सत्तानाट्यांमध्ये बदलू पाहणाऱ्या राजकीय संस्कृतीची चर्चा गौण ठरता कामा नये. मतांसाठीच्या स्पर्धेमुळे संघराज्यीय लोकशाही परंपरेला तडे जाणे कोणासही हितकारी ठरू शकत नाही. सुप्रीम कोर्ट किंवा ईडी अस्त्र वापरून विरोधकांना नामोहरम करणे किंवा त्यांचे अस्तित्व संपवणे भारतासारख्या लोकशाही राष्ट्रास घातक ठरू शकते. त्याचवेळी भाजपचे एकचालकानुवर्ती वर्तन, दंडेलशाही, सार्वजनिक मालमत्तांची विक्री, घराणेशाही, जातीय राजकारणाची चलती व वाढलेला भ्रष्टाचार (ज्यामुळे ईडी इस्त्राला गती आली) या घटकाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

●

**कलीम अजीम**
मुक्त पत्रकार, पुणे
kalimazim2@gmail.com